## अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** न्यु इंग्लिश हायस्कूल चद्रंपूर येथे आज दिनांक ३१ मे २०२५ रोजी ३०० वर्ष जन्मशताब्दी निमीत्ताने राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठ्या ऊत्साहात धनोजे कुणबी महिला मंडळाच्या वतीने साजरी करण्यात आली . कार्यक्रमाचे आयोजन जिजाऊ गृपने केले. कार्यक्रमात छाया लांडे, अनिता बोढे यांनी स्वागतगीत म्हटले. धनोजे कुणबी मंडळाच्या अध्यक्षा सविता सातपुते कोट्टी यांची उपस्थीती होती. त्यांनी आपले विचार जन्मशताब्दी निमीत्ताने मांडले.

## शंकरपुरात चोरट्यांचा धुमाकूळ

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ७ जून :** शंकरपूर येथे रविवारच्या मध्यरात्री सहा दुकाने व दोन घर फोडले आहे यात किती रक्कम चोरीला गेली याचे आकडे जरी अद्याप पर्यंत समोर आलेले नाही. शंकरपूर येथील बस स्थानक परिसरातील ग्रामपंचायतची चाळ आहे. या ग्रामपंचायतीमधील पाच दुकाने फोडण्यात आले त्यात पवन शेरकी यांच्या मालकीचे पवन कृषी केंद्र येलसेट्टीवार यांच्या मालकीचे सायकल स्टोअर्स मनोज जाजू यांच्या मालकीचे वस्त्र भंडार चेतन घोडेस्वार यांच्या मालकीचा रिवायडींग सेंटर दिवाकर बावनकर यांचा मालकीचे किराणा दुकान अशा विविध ठिकाणी घरफोडी केली आहे.

# गांजा विकणाऱ्या २ आरोपींना अटक

### रामनगर पोलिसाची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि.७ जून :** गांजा विकी करणाऱ्या दोन आरोपींना रामनगर पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडून १,०४,३०० रु.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी गांजा विकी करण्यासाठी येणार आहे. अशा विश्वासनिय माहिती वरुन रामनगर पोलिसांनी सापळा रचून आरोपीस ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता एका प्लॉस्टीक पन्नीत गांजाचे झाडाचे पाने, फुले, बोंडे व बिया वजन १ किलो ७८१ ग्रॅम किंमती ९,००० रु.चा गांजा नावाचा अंमली पदार्थ, एकपल्सर मो. सायकल क. एम. एच.३३एएफ ९५८६ असा एकुण १,०४,३००रु.चा मुद्देमाल दि. ६ जून रोजी सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान मूल रोड चंद्रपूर येथील डॉ. वरगंटीवार यांच्या समोरील मोकळ्या मैदानातून जप्त करण्यात आला.आरोपीचे नाव अजित रतन रॉय वय ३८ वर्ष काम-शेती, सत्यजित गौरंग मंडल वय २९ वर्ष काम शेती दोन्ही रा. उदयनगर ता. मुलचेरा जि. गडचिरोली असे आहे. त्यांच्यावर ८(क), २०(ब), ग्ग(ब), २९ एन.डी.पि.एस. ॲक्टनुसार कारवाई करण्यात आली. वरील कारवाई रामनगर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक आसिफराजा शेख, सहा. पोलीस निरीक्षक देवाजी नरोटे, हनुमान उगले, पोलीस अंमलदार जितेंद्र आकरे, आनंद खरात, सचिन गुरनुले, पेतराज सिडाम, प्रशांत शेंदरे, लालु यादव, शरद कुडे, मनिषा मोरे, रविकुमार डेंगळे, संदीप कामडी, हिरा गुप्ता, पंकज ठोबरे, प्रफुल्ल पुष्पलवार, शक्ती कोरवार, ब्युल्टी साखरे, यांनी केली आहे.

## अट्टल गुन्हेगाराकडून जबरी चोरीचा ऐवज व मोटर सायकल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरची कारवाई



जिल्हयामध्ये होत असलेल्या वाहन चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्याकरिता जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष निर्देश दिले होते वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक अमोल काचोरे यांनी विशेष पथक तयार करून त्यांना त्याबाबत निर्देश दिले होते. पोलिस निरीक्षक अमोल काचोरे स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुनिल गौरकार स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर सह पोलीस पथक चंद्रपूर शहरात चोरीचे रेकॉर्डवरिल गुन्हेगार शोध मोहीम पेट्रोलिंग राबवीत असतांना मुखबीरद्वारे गोपनिय माहिती मिळाली कि, रेकॉर्डवरील आरोपी जनरलसिंग उर्फ मन्नुसिंग टाक वय ४५ वर्षे रा. समतानगर, नेरी चौक, उर्जानगर चंद्रपूर हा एस.टी वर्कशॉप तुकुम चंद्रपूर येथे चोरीचे वाहन विकण्यास येणार असल्याचे माहिती वरून एस.टी. वर्कशॉप जवळ सापळा रचला असतांना सदर ईसम हा एस.टी. वर्कशॉप चौक दुर्गापुर रोड, तुकुम चंद्रपूर येथे विना क.ची मोटर सायकल घेउन गिराईक शोधत असताना दिसला. त्यास शिताफिने पकडुन सखोल विचारपुस केली असता त्याने एक महिण्यापुर्वी स्पलेंडर प्रो मोटरसायकल नायडु हॉस्पीटल. तुकुम चंद्रपुर येथुन चोरी केल्याचे कबुल केले. वरून आरोपीकडन मोटरसायकल हस्तगत करून पोस्टे दुर्गापुर अप.क. ११२/२०२५ कलम ३०३(२) बिएनएस चा गुन्हा नमुद उघडकीस करण्यात आला. एक काळया पांढरी रंगाची स्पलेंडर प्रो मोटर सायकल keâ. MH 34 AX 3848 हि गाडी जप्त केली. तसेच आरोपी नामे जनरलसिंग उर्फ मन्नुसिंग टाक वय ४५ वर्षे रा. समतानगर, नेरी चौक, उर्जानगर चंद्रपुर यास विश्वासात घेउन सखोल विचारपुस केली असता त्याने गडचिरोली येथे महिलेकडुन सोन्याची चैन हिसकावुन जबरी चोरी केल्याचे कबुल केले. सदर गुन्हयाचे माहिती घेतली असता पोस्टे गडचिरोली येथे अप क.३११/२०२५ कलम ३०४ बिएनएस अन्वये गुन्हा दाखल असल्याचे समजले. सदर घटनेची माहिती स्थनिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांना देण्यात आली आहे.

# कृषी पंपाकरीता विशेष बाब म्हणून विज जोडणी द्या

### आमदार सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाची समस्या मोठी असून यादृष्टीने उपाययोजना म्हणन चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपाकरीता विशेषबाब म्हणून विज जोडणी उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपाला विद्युत जोडणी मिळण्यामध्ये येत असलेल्या अडचणी संदर्भात भाजपा किसान मोर्चा चंद्रपूर जिल्हाध्यक्ष बंडू मधुकर गौरकर यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देऊन समस्या मांडली होती. त्या अनुषंगाने आमदार मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समस्या अवगत करीत मागणी केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील कृषी पंपाला विद्युत जोडणी मिळण्याकरिता आवेदन केले असून डिमांडचा भरणा केलेला आहे. परंतु त्यांना अजुनपर्यंत विद्युत जोडणी करुन मिळालेली नाही.

'बळीराजा कृषी विज माफी योजना' लागू झाल्यापासून शेतकऱ्यांना कृषी पंप विद्युत जोडणी देणे बंद करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील जमीनीची पाण्याची पातळी १५० फुटापर्यंत आहे. त्यामुळे सौरपंप उपयोगी पडणार नसल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विशेषबाब म्हणून कृषी विज जोडणी करुन देण्याची विनंती निवेदनामार्फत केली आहे. त्याअनुषंगाने याबाबत योग्य कार्यवाहीसाठी संबंधिताना आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील कृषी पंपाच्या विद्युत जोडणीसाठी भरलेल्या डिमांडबाबत शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने सुधीर मुनगंटीवार यांनी यापूर्वी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी केली आहे.

## गृहमंत्री फडणवीस साहेब घुग्घूसच्या वाहतूक पोलीसावर कारवाई करणार का ?

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि.७ जून :** पोलीस खात्यातील महत्वाचा विभाग म्हणजे वाहतूक शाखा होय.या शाखेतील वाहतूक पोलीस शहरातील बंदोबस्त, शहरातील महत्वाच्या ठिकाणी वाहतुकीस अडथळा न व्हावा यासाठी वाहतूक पोलिसांची नेमणूक केली असते. मात्र घुग्घूस वाहतूक पोलीस शाखेच्या विभागाचे वेगळेच असून वाहतूक शाखा आर्थिक मोहमाया जमविण्यात व्यस्त असल्याची चर्चा आहे.

या जमवलेल्या आर्थिक मोहमायात वरिष्ठ अधिकाऱ्यांसह, वाहतूक पोलीस निरीक्षक, वाहतूक पोलीस यांचा काही हिस्सा असल्याची कुजबुज आहे. वणी- घुग्घूस मार्गावरील राजीव रतन चौकात निर्मानाधीन उड्डाणंपुलाचे काम सुरु असल्यामुळे याठिकाणी दिवसातून २० ते २५ वेळ रेल्वे फाटक अर्धा -अर्धा तास बंद असतो यामुळे दोन्ही बाजूला वाहनाची रांगच रांग लागतात.

या ठिकाणी वाहतूक पोलिसांची आवश्यकता असताना ते वणी मार्गावरील टेम्पो क्लब परिसरात राहून जड वाहतूक या मार्गावरून सोडण्यासाठी वाहन चालकांकडून मोठ्या अर्थ व्यवहाराची मागणी करतात व नंतर ५ वर ०० शून्य चालकाकडून घेऊन वाहन सोडल्या जात असल्याचे वाहन चालकात चर्चा आहे.!

महत्वाचे म्हणजे उपप्रादेशिक विभागाच्या अधिकाऱ्याची ही जबाबदारी आहे मात्र घुग्घूस वाहतूक शाखेतील पोलीस वाहतूक अधिकारी वसुलीच्या नावाने ट्रक चालकांकडून सर्रास लूट करीत असल्याची माहिती नागरिकांसह प्रसार माध्यमात आहे.

या वाहतूक शाखेच्या वसुली बहादरावर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभीर्याने घेऊन कारवाई करावी अशी मागणी ट्रक चालक व नागरिकांनी केली आहे.

# विविध सामाजिक उपक्रमांनी विवाह सोहळा संपन्न

### वर वधू निलेश व पुष्पा यांचे प्रेरणादायी पाऊल



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि.७ जून :** विवाह सोहळा म्हटले की प्रचंड खर्च, झगमगाठ, देखावा, जल्लोष परंतु जीवनातील महत्त्वपूर्ण अशा विवाह सोहळ्याला सुद्धा सामाजिक संवेदनशील तेची जोड देऊन एक अनुकरणीय असा मोलाचा संदेश काहीजण देतात. असाच एक आगळावेगळा विवाह सोहळा स्थानिक ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात पार पडला.

ज्यामध्ये दिव्यांग कल्याण क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणारे निलेश पाझारे यांचा विवाह पुष्पा सावसागडे यांचेशी नोंदणी पद्धतीने संपन्न झाल्यावर विवाहाच्या सर्वच पारंपारिक पद्धतीना फाटा देत दिव्यांगांना स्वयंचलित वाहन, अंध स्मार्ट काठी, श्रवण यंत्र आणि कुबडीचे वाटप करण्यात आले तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथील दिव्यांग विभागाला व्हीलचेअर सुद्धा भेट देण्यात आले सोबतच विवाह सोहळ्याला उपस्थित असलेल्यांना दिव्यांग, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल व्यक्तींसाठी असलेल्या शासकीय योजनांची माहिती देण्याचा उल्लेखनीय उपक्रम सुद्धा घेण्यात आला.

ज्यामध्ये समाजसेवा अधीक्षक भास्कर झळके आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. कविश्वरी कुंभळकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेची सविस्तर माहिती दिली. वर निलेश स्वतः दिव्यांग असून ते मागील अनेक वर्षांपासून दिव्यांग कौशल्य विकास मल्टीपर्पज सोसायटीच्या माध्यमातून दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्यरत आहेत तसेच विविध सामाजिक चळवळीत सुद्धा ते सक्रिय आहेत.

सदर विवाह सोहळ्याने एक सकारात्मक असा अनुकरणीय सामाजिक संदेश समाजाला दिला असून सर्वत्र पाझारे व सावसाकडे कुटुंबाचे कौतुक होत आहे. या विवाह सोहळ्याला चंद्रपुरातील विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होते.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मेंडकीच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा

### सैनिकी स्कूल परीक्षेत तीन विद्यार्थी पात्र,'शाळेचा अभिमान उंचावला



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ७ जून :** पंचायत समिती ब्रम्हपुरी अंतर्गत मेंडकी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचे तीन विद्यार्थी सैनिकी स्कूलच्या परीक्षेत क्वालिफाय झालेले असून शाळेचा व गावाचा नाव उज्वल केला आहे. या विद्यार्थ्यांनी कठोर अभ्यास, मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे हे यश संपादन केलेले आहे.

या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांची मेहनत आहे. देवर्ष फाल्गुन आंबोरकर, सान्वी सुनील दुधे, देव्या गुरुदेव वाघुळकर असे हे तीन विद्यार्थी. शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक हरिदास तलमले यांनी सांगितले,'ही केवळ शाळेचीच नव्हे तर संपूर्ण परिसराची अभिमानास्पद बाब आहे. यामुळे इतरांना प्रेरणा मिळेल'. शिक्षीका नलिना शहारे यांनी या विद्यार्थ्यांसाठी विशेष मोलाचे मार्गदर्शन केले. सुट्टीच्या दिवशी शाळेत जाऊन ज्यादा वर्ग घेतले. यांचे या यशात मोलाचे योगदान आहे. शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले, अभिनंदन केले. हा निकाल शाळेसाठी ऐतिहासिक असून यापुढील काळात विद्यार्थ्यांना आणखी अशा संधी मिळाव्या यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

## उसेगाव स्मशानभुमी जवळ शार्ट सर्कीटमुळे क्रेन जळाली



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ७ जून :** चिमूर तालुक्यातील उसेगांव जवळील स्मशानभुमी जवळ भरदुपारी १.३० वाजता ७ जुन शनीवारला क्रेन मार्गक्रमण करीत असलेल्या पोलचा वीजेचा तार लागुन शार्क सर्कीट होऊन क्रेनला आग लागली. क्रेन च्या चालकाला वैद्यकीय उपचारार्थ चिमूरला हलवीण्यात आले.


सवीस्तर वृत्त असे आहे कि , एम के एस कंपनीची मालमत्ता आणण्यासाठी नेरी - उसेगांव मार्गे पळसगांव ( पी.) ला मटेरीयल शीप्टींगसाठी जाणार होती.ही क्रेन खुराणा यांच्या मालकीची असल्याचे सांगण्यात आले.चालक हा शंकरपुर येथील असल्याचे या कंपनीच्या कामगारांनी सांगीतले.

क्रेन मार्गक्रमण करीत असतानी उसेगांव जवळील स्मशानभुमी जवळ रस्त्यालगत असलेल्या पोलच्या विजेच्या ताराला क्रेन चा स्पर्श झाला.आणी घटकेतच क्रेननी पेट घेतला.या क्रेन चालकाला सुध्दा करंट झटका पोहचला. वेळ न घालवता चालकांनी कबीनमधुन उडी मारली. आणी लगेच वेळ घालवता हेल्परनी गाडी बोलावून चालकाला वैद्यकीय उपचारासाठी चिमुरला हलवीण्यात आले . तसेच विद्युत विभागाला तुरंत नागरीकांनी कळवून उसेगांवचे लाईन मेन नन्नावरे यांनी लगेच सीटडाऊन घेतले .व स्वता घटनास्थळी उपस्थीत होते .

चिमूर नगरपरीषदेची अग्नीशमन दलाची सुध्दा गाडी वेळेवर पोहचुन क्रेन ला लागलेली आग वीझवीण्यात आली.पण तोपर्यंत क्रेन बऱ्याच पैकी जळालेली होती.बऱ्याच वेळपर्यंत नेरीला जाणारे व वाघेडाकडे जाणारे प्रवासी अडकुन होते.आग विझवीण्यासाठी उसेगांव येथील नागरीकांनी मदत केली. समयसुचकेतेमुळे होणारी जीवीतहानी टळली.

# घरकुलांच्या लाभार्थ्यांना फुस लावून रेतीची परस्पर विक्री करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करा : ॲड. हिमानी वाकुडकर

### मूलच्या तहसिलदार मृदूला मोरे यांच्याकडे निवेदन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ७ जून :** घरकुलांच्या लाभार्थ्यांना फुस लावून रेतीची परस्पर विक्री करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी अशी मागणी नांदगावच्या समाजसेविका ॲड.हिमानी वाकुडकर यांनी मूलच्या तहसिलदार मृदूला मोरे यांच्या कडे एका लेखी निवेदनातून नुकतीच केली आहे.

तहसिलदार मूल यांना सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की दि. ३ जून/२०२५ रोज मंगळवारला नांदगावच्या घरकूल लाभार्थ्यांना चिचाळा घाटातून टी पी व्दारे रेती वितरण करण्यात आली.

सदरहु रेतीचा गोरखधंदा नांदगाव येथील प्रभारी सरपंच सागर देवूरकर करीत आहेत. गैरअर्जदारांनी शासकीय रेती वाटप करण्याचे उद्देशाने दोन ट्रॅक्टर किरायाने घेतले असून ते आपल्या पदाचा गैरवापर करीत आहे सर्व घरकुल लाभार्थ्यांचे टी पी बुक त्यांनी आपल्याकडे ठेवले आहे. लाभार्थ्यांना घरोघरी भेटुन फुस लावून तुम्हाला रेती आणून देतो म्हणुन पैसै उकळून टी पी वर सह्या घेवून ठेवल्या आहेत. प्रत्येक लाभार्थ्यांना घरपोच टी पीचे वाटप करण्यात आले नाही , बहुतेक लाभार्थ्यांनी घरकूल बांधकामास सुरुवातही केलेली नाही, त्यांचे

टीपीवर गैरअर्जदार सह्या घेवून तो स्वतः जवळ जमा करून ठेवत आहे . नुकतीच उचल केलेली चार ट्रॅक्टर रेती लाभार्थ्यांचे घरी न टाकता स्वतः प्रभारी सरपंचांनी पोंभूर्णा तालुक्यातील घोसरी क्षेत्रात उमेश अल्लीवर यांना परस्पर विक्री केली आहे, त्याचे फोटो व्हिडियो (तक्रारदात्याकडे ) उपलब्ध आहे, या रेती तस्करांची तत्काळ चौकशी करावी व टी पी नुसार उचल केलेली रेती घरकूल लाभार्थ्यांना मिळावी, रेतीची परस्पर विक्री करणाऱ्यांवर पोलीस कारवाई करावी व किरायाने घेतलेले व गैरवापर केलेलें ट्रॅक्टर रेती घाटावरून तातडीने बंद करावे.

उपरोक्त प्रकरणात आपण वरिष्ठांकडे तक्रार सादर करणार असल्याचे अधिवक्ता हिमानी वाकुडकर यांनी या प्रतिनिधीशी बोलताना आज सांगितले.

महसूल विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेत या बाबतीत सखोल चौकशी करावी जेणेकरून असे प्रकार थांबतील .

## मंत्री शेलारच्या हस्ते हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीला स्पीसिज अँड हॅबिटॅट वॉरियर पुरस्कार



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि.७ जून :** वन्यजीवांच्या भ्रमणमार्ग सुरक्षित रहावे याच्यासाठी सातत्याने झटणाऱ्या हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटी ला कंझर्वेक्षण ॲक्टिव्हिजन गटात स्पीसिज अँड हॅबिटॅट वॉरियर पुरस्कार, सावरकर सभागृह, शिवाजी पार्क, मुंबई येथे माननीय सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार व किरण शेलार, संपादक मुंबई तरुण भारत, यांच्या हस्ते मुंबई येथे प्रदान करण्यात आला.

जंगल क्षेत्रात वन्यजीवांच्या हालचाली असतातच पण, वनक्षेत्र नसलेल्या पण वन्यजीव अधिवास असलेल्या क्षेत्रात हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटी चे अध्यक्ष दिनेश खाटे वन्यजीवांचे हालचालीवर लक्ष ठेवून, वन्यजीवांचे होत असलेल्या अपघाताची नोंदी ठेवून उपशमन योजना राबवीण्यासाठी सूचना करण्यात येतात, जेणेकरून वनक्षेत्र नसलेल्या क्षेत्रात सुद्धा वन्यजीवांचा विचार करायला हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटी भाग पाडते. पुरस्कार स्वीकारण्या साठी संस्थेचे अध्यक्ष दिनेश खाटे, नितीन माढई, अमित देशमुख, करण तोगट्टीवार, नयन कुंभारे उपस्थित होते. हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटी चे अध्यक्ष दिनेश खाटे यांनी २०१६ पासून मिलिंद परिवाकम यांच्या हाताखाली मध्य भारतात ही चळवळ सुरु केली होती, नंतर चंद्रपूर येथे ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प -कन्हाळगावं अभयारण्य-कावल व्याघ्र प्रकल्प हया भ्रमनमार्ग वाचविण्यासाठी कार्य सुरु केले, त्यात अनेक हायवेचे अनेक मोठे प्रोजेक्ट चंद्रपूर जिल्ह्यात होऊ घातले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राष्ट्रीय मार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी समन्वय साधून, वन्यजीव भ्रमानमार्गावर उपशमन योजना राबवीण्यासाठी मागणी उचलून धरण्यात आली आदि कामांची दखल घेण्यात आली.

## कामगाराच्या कुटूंबीयांना मदतीची मागणी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ७ जून :** सुनील नामदेव देवतळे, रा. घोडपेठ, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर हे धारिवाल थर्मल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, ताडाळी या कंपनीत G.T.I. Security मधून कार्यरत होते. त्यांची प्रकृती अस्वस्थ राहिल्याने दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.निधनानंतर तीन महिने उलटूनही कंपनीकडून स्व. देवतळे यांच्या कुटुंबाला देय असलेली उर्वरित रक्कम अद्याप देण्यात आलेली नाही. याशिवाय कंपनीच्या वतीने त्यांच्या मुलीला नोकरीवर घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

## भारतीय कम्यूनिष्ट पक्षाचे त्रैवार्षीक अधिवेशन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** नुकतेच भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे चंद्रपूर शहर व चंद्रपूर तालुका त्रेवार्षिक अधिवेशन एक दिवशीय संयुक्त खदान मजदूर संघ आयटक कार्यालय चंद्रपूर येथे पार पडले.या कार्यक्रमाचे उदघाटक कॉम्रेड रवींद्र उमाटे राज्य कौन्सीलसदस्य भारतीय कम्युनिस्ट पक्ष चंद्रपूर कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉम्रेड राजू गैनवार माजी नगरसेवक व जिल्हा सहसचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष भद्रावती प्रमुख पाहुणे म्हणून कॉम्रेड रवींद्र उमाटे राज्य कौन्सिल सदस्य भा क पा चंद्रपूर कॉम्रेड प्रकाश रेड्डी जिल्हा सचिव भाक पा चंद्रपूर कॉम्रेड राजू गैनवार माजी नगरसेवक व जिल्हा सहसचिव भाकपा भद्रावती कॉम्रेड मल्लेश कमटम जेष्ठ कार्यकर्ते भा क पा चंद्रपूर म्हणून मंचावर उपस्थित होते.

# अम्मा की छाया सामाजिक सभागृह आईच्या मायेचा स्पर्श देणारी ग्रामविकासाची नवी वाट ठरेल - आ. किशोर जोरगेवार

## वेंडली येथे अम्मा की छाया - सावली मायेची उपक्रमांतर्गत तयार होत असलेल्या समाज भवनाचे भूमिपूजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** आजचा हा दिवस फक्त एक भूमिपूजन नाही, तर आपल्या गावात आईच्या मायेचा स्पर्श घेऊन नव्या वाटेवर पडलेलं एक पाऊल आहे. अम्मा की छाया, सावली मायेची हे नाव उच्चारताच एक मायेची छाया मनात दरवळते. गावाचा खरा विकास रस्त्यांनी किंवा इमारतींनी होत नाही, तर तो संस्कारांमधून, समविचारातून आणि एकत्र येण्याच्या जागांमधून होत असतो. त्यामुळे येथे साकार होत असलेले अम्मा की छाया समाज भवन आईच्या मायेचा स्पर्श देणारी ग्रामविकासाची नवी वाट ठरेल, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.




ग्रामविकास निधीतून मायेची सावली उपक्रमांतर्गत वेंडली येथे मंजूर सामाजिक सभागृहाच्या कामाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टीचे जिल्हा महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भारतीय जनता पार्टीचे नेते प्रकाश देवतळे, नामदेव डाहुले, सरपंच प्रतिमा अलवलवार, प्रकाश अलवलवार, माजी सरपंच कैलास चिवंडे, आशिष माशिरकर, आनंदराव पिंपळशेंडे, पोलिस पाटील संजय पाटील, विनोद खेवले, श्रीरंगपाटील वरारकर, मेश्राम आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, सामाजिक सभागृह म्हणजे केवळ भिंती नाहीत, ही आपल्या संस्कृतीची, आपुलकीची आणि एकतेची वास्तू आहे. या जागेवरून अनेक माऊल्यांचे आशीर्वाद पसरतील, इथे मुलांना शिकण्यासाठी आधार मिळेल, महिलांना आत्मनिर्भरतेची दिशा सापडेल, तर युवक-युवतींना आपली कला, क्रीडा आणि विचार व्यक्त करण्याची संधी मिळणार आहे. या जागेचा उपयोग समाज घडवण्यासाठी व्हावा, नात्यांना जोडण्यासाठी व्हावा आणि पुढच्या पिढ्यांना नवा विचार देण्यासाठी व्हावा.

या भवनामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करता येईल. स्थानिक युवक-युवतींना, कलाकारांना आणि नागरिकांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी एक भक्कम मंच मिळेल. संघटन, समता आणि संस्कृतीचे मूल्य जपणारे हे केंद्र भविष्यात गावाच्या सर्वांगीण विकासाचे प्रतीक ठरेल. हा उपक्रम समाजाला एकत्र बांधणारा, प्रेरणा देणारा आणि नवचैतन्य निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला. यावेळी येथीलच सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या समाज भवनाचेही आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला इरई नदी खोलीकरणाच्या कामाचा आढावा

## दुसऱ्या टप्प्याचे काम सोमवारपासून

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** चंद्रपूर शहराला ९ कि.मी. समांतर वाहणा-या इरई नदीच्या खोलीकरणाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याच्या कामाला सोमवारपासून सुरुवात होणार आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज (दि. ७) संबंधित यंत्रणेचा आढावा घेऊन सूचना दिल्या.

व्हीसीद्वारे घेण्यात आलेल्या या बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम) अक्षय पगारे, जलेश सिंग (जलसंपदा), जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार आदी उपस्थित होते.

इरई नदीचे खोलीकरण तीन टप्प्यात करण्यात येणार असून यातील पहिला टप्पा रामसेतू ते चौराळा पुलापर्यंत



काम पूर्ण झाले आहे. दुसरा टप्पा माना खदान (लालपेठ कॉलरी) ते नांदगाव पोडे,असा असून सदर कामाला सोमवारपासून सुरवात होईल. तर तिसरा टप्पा इरई ते वर्धा नदी संगमापर्यंतचा आहे. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी ना. गौडा म्हणाले, दुसऱ्या टप्प्यात जास्तीत जास्त काम करून खोलीकरणातून निघालेला गाळ त्वरित वाटप करावा. माना खदान ते नांदगाव पोडे टप्प्यासाठी गाळ संचयित करण्याचे ठिकाण उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी निश्चित करण्यासाठी रोज पाहणी करावी. त्याचबरोबर भूमी अभिलेख आणि जलसंपदा विभागाने दुसऱ्या टप्प्यातील आखणी करून त्वरित कामाला सुरवात करावी.

### असे झाले पहिल्या टप्प्यातील काम :

रामसेतू ते चौराळा पूल दरम्यान २४०० मीटरचे काम पूर्ण झाले आहे. यात ७० टीसीएम गाळ उपसा करण्यात आला असून ११८ शेतकऱ्यांना १७ हजार ब्रास गाळ वाटप करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात १० पोकलेन, २५ ट्रॅक्टर, २२ टिप्पर कार्यरत आहेत. दुसऱ्या टप्प्यात या यंत्र सामुग्रीसह अतिरिक्त यंत्र सामुग्री वाढविण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे.

# नांदा फाटा - आवाळपूर - सांगोडा रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

## रविकुमार बंडीवार यांनी आ. देवराव भोंगळे यांच्याकडे निवेदन दिले

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ७ जून :** नांदा फाटा ते सांगोडा हा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, या रस्त्याची तातडीने डांबरीकरण करून दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रविकुमार बंडीवार यांनी आमदार देवराव भोंगळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



सदर रस्ता आवालपूर गावामार्गे सांगोडा गावाशी जोडला गेलेला असून, या मार्गाचा दररोज शेकडो ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि महिला वापर करतात. मात्र सध्या रस्त्यावर मोठमोठाले खड्डे पडले असून, वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय होत असून, अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

या रस्त्याच्या तातडीने डांबरीकरणास मंजुरी मिळावी आणि लवकरात लवकर काम सुरू व्हावे, अशी मागणी रविकुमार बंडीवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे. यासोबतच त्यांनी रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

ग्रामस्थांनीही या मागणीस पाठींबा देत, रस्त्याचे काम न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. याबाबत आमदार देवराव भोंगळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# बांबेझरी गावात महिला बचत गटातील महिलांचा बांबू प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ७ जून :** माणिकगढ सिमेंट वर्क्स ,सी.एस आर अंतर्गत बांबेझरी या गावातील महिला बचत गटातील महिलांना बांबूपासून विविध गृहोपयोगी शोभेच्या वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

अल्ट्राटेक सिमेंट कंपनी महिलांना समाजात महत्वाचे स्थान मिळावे,या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिला स्वावलंबी बनून आपल्या कुटुंबाचा आधार बनल्या पाहिजे या उद्देशातून हे प्रशिक्षण देण्यात आले.

हे प्रशिक्षण सतत ८ दिवस देण्यात आले. या ८ दिवसाच्या काळात महिलांनी विविध वस्तू बनविल्या. उदाहरणात - फुलांची कुंडी, फुलदाणी, फळदानी, चम्मच,फोटो फ्रेम इत्यादी वस्तू बनविणे शिकल्या. हे प्रशिक्षण देण्यासाठी आदरणीय राजू राणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक ६ जून२०२५ ला या प्रशिक्षणाची समापन करण्यात आले.समापन करण्या करिता गावातील सरपंच मनीषा पेंदोर यांची उपस्थिती होती .मनीषा पेंदोर यांनी बचत गटातील महिलांना महिलांना प्रोत्साहन दिले.सर्व गावकऱ्यांनी ,बचत गटातील महिलांनी, सरपंच ताई मनीषा पेंदोर यांनी अल्ट्राटेक कंपनी सी.एस आर टीम चे धन्यवाद मानले.

# जागतिक पातळीवर लोककलांच्या वाट्याला दुर्दैवी वास्तव येतं

## डॉ.खानोरकरांच्या ' संजोरी ' ग्रंथाचे प्रकाशन : प्रा.सुरेश द्वादशीवारांचे प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** रशियातील लोकनृत्य पाहायला रशियन नसतात,बाहेरचे पर्यटक असतात. मी नंदुरबार पासून देश, विदेशातील गडचिरोलीच्या सिरोंच्यापर्यंतचे आदिवासी पाहिले.ते गरिब,दरिद्री, कष्टकरी आहेत पण ते दुःखी, खिन्न,निराश नाहित.त्यांच्या पोरांच्या तोंडावर माशा बसतात पण ते हसतात. चांगले लेख प्रा.खानोरकरांनी ' संजोरी'त लिहलेत अन् ते खास विनोदी शैलीत.'संजोरी ' म्हणजे धान चुरन्याचे खळयावरील शेवटच्या मोळयाचे मटनाचे जेवन. या देशातले ८४ टक्के हिंदू मांसाहारी आहेत.' संजोरी ' याही दृष्टीने महत्त्वाची आहे.जे इतिहास विसरतात त्याला भविष्य असत नाही. ग्रामीण, आदिवासी,झाडीपट्टीचे सौंदर्य ' संजोरी 'त आहे.येथील ' झाडी माणसाची 'मोह'माया 'हा अत्यंत सुंदर लेख.कधीतरी संचिताकडे आपण लक्ष दिले पाहिजे,ते यांनी दिले.तिखट ही चव आहे.हिरोती हा त्याचा खरा शब्द आहे.संवाद हे साध्य आहे,भाषा माध्यम आहे,म्हणून संवाद व्हावा. ' संजोरी 'पुस्तकात राहू नये ती लोकांच्या मनात जावी. आपण या लोककलांपासून दूर चाललो आहोत



म्हणून जागतिक पातळीवर लोककलांच्या वाटयाला दुर्दैव येतं.' असे बहूमूल्य विवेचन ज्येष्ठ संपादक व प्रसिद्ध कादंबरीकार प्रा.सुरेश द्वादशीवारांनी केले.

ते डॉ.धनराज खानोरकर लिखित झाडी लोककला, लोकसंस्कृतीच्या 'संजोरी' ग्रंथ प्रकाशनानिमित्त श्रमिक पत्रकार संघ भवनात बोलत होते.'संजोरी'चे प्रकाशन त्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.कार्यक्रम चंद्रपूर जिल्हा झाडी बोली साहित्य मंडळाने आयोजित केला होता.

विचारपिठावर भाष्यकार म्हणून नागपूरचे प्रसिद्ध लेखक व समीक्षक डॉ.प्रमोद मुनघाटे,डॉ.श्याम मोहरकर, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर व लेखक डॉ.धनराज खानोरकर,कवी अरुण झगडकर उपस्थित होते.

यावेळी डॉ.मुनघाटे म्हणाले,' 'संजोरी 'हा प्राध्यापकांचा संशोधन पेपर नव्हे ते झाडीचे सांस्कृतिक संचित आहे.हे त्यांनी एक पुस्तकरुपाने दस्तऐवज म्हणून आपल्या सामोर आणलं आहे.झाडीच्या लोककलांबद्दलचा असा पुस्तक पहिल्यांदाच आला.ते यमक ,श्लेष वापरतात व स्वतःच नव्या म्हणींना जन्म देतात.हे प्रा.खानोरकरांचे काम बहुमूल्य असे आहे. 'तर डॉ.मोहरकरांनी, डॉ खानोरकरांनी स्वतःची खास शैली घडवली असून बोलणं, लिहिणं,वागणं एका तालात आहे.' संजोरी ' वाचतांना याची पानोपानी प्रचिती येते,असे विचार मांडले.

प्रास्ताविकातून ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकरांनी झाडीबोलीचा इतिहास कथन केला. डॉ.खानोरकरांनी 'संजोरी' जन्माची कथा सांगीतली. संचालन चंद्रपूर झाडीबोली मंडळाचे अध्यक्ष कवी अरुण झगडकरांनी तर आभार कवी प्रशांत भंडारेंनी मानले. कार्यक्रमाला अनेक कवी, लेखक,विचारवंत श्रोते उपस्थित होते.

# ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त लष्करी ईदगाह कमेटीच्या कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार यांची उपस्थिती

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ७ जून :** चंद्रपूर जिल्ह्यात ईद-उल-अजहा (बकरी ईद) हा पवित्र सण मुस्लिम बांधवांकडून मोठ्या श्रद्धा, एकता आणि उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त लष्करी ईदगाह कमेटी तर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार यांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी अनवर खान, साबिर सर, जहिर काजी, इजहार काजी, अफिसुर रहमान, राशिद



हुसेन, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, पोलिस उपविभागीय अधिकारी सुधारकर यादव, शांतता समितीचे रमजान अली घायल, खत्री, इमरान शेख, सय्यद अबरार व मुस्लिम बांधवांची उपस्थिती होती.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी ईदगाहमध्ये येणाऱ्या मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फूल देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान लष्करी ईदगाह कमेटीच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार किशोर जोरगेवार यांचे स्वागत केले.

ईद-उल-अजहा हा सण त्याग, समर्पण आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक आहे. विविध धर्मांचे, संस्कृतींचे लोक जेव्हा एकत्र येतात, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही संकल्पना साकार होते, असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.

# लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन,घुग्घुसच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस दि. ७ जून :** प्रादेशिक परिवहन कार्यालय (आर.टी.ओ.)व लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन,घुग्घुस यांच्या वतीने येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात (आर.टी.ओ.)प्रादेशिक परिवहन कार्यालय अधिकारी किरण मोरे,लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे युनिट हेड वाय.जि.एस प्रसाद,वरिष्ठ उपाध्यक्ष प्रशांत पुरी, सहाय्यक महाप्रबंधक विद्या पाल आणि प्रादेशिक परिवहन येथील अधिकारी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, 'वृक्ष हे पृथ्वीवरील जीवनाचे आधारस्तंभ आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे आणि यावर मात करण्यासाठी अधिकाधिक झाडे



लावणे आवश्यक आहे.'

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आवारात विविध प्रकारच्या देशी झाडांची रोपे लावण्यात आली. त्याचप्रमाणे लॉयड्स इन्फिनाईट फॉउंडेशन अंतर्गत (आर.टी.ओ.) परिसरात फळ,फुल वृक्ष लागवड चे संपूर्ण काम करून देण्यात येत आहे तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच, या झाडांचे संगोपन करण्याची आणि भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम राबवण्याची ग्वाही यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमामुळे पर्यावरणाविषयी जनजागृती झाली असून, नागरिकांनीही आपापल्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी शिवाजी विभुते यांनी केले तर आभार दिपक साळवे यांनी म्हणाले कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी अनुराग मत्ते व रमण पानपट्टे यांनी प्रयत्न केले.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, घुग्घूसचे पोलिस स्टेशनला निवेदन

# पत्रकार सिद्धार्थ भोकरे यांना दिलेल्या जीवघेण्या धमकीप्रकरणी त्वरित कारवाई करावी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि.७ जून :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे डिजिटल मिडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांना एका अज्ञात इसमाकडून निनावी पत्राद्वारे जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. दिनांक १५ मे २०२५ रोजी त्यांनी एका दैनिकातून 'सिंदूर ऑपरेशन' संदर्भात व्यक्त केलेल्या मतानंतर ही धमकी प्राप्त झाली आहे. या पत्रात 'माफी माग नाहीतर तुला उडवून देऊ' असा थेट इशारा देण्यात आला आहे. ही घटना पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर व सुरक्षिततेवर घाला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यभरातील पत्रकार बांधव याबाबत तीव्र निषेध



व्यक्त करत आहेत. अनेक तालुका व जिल्हास्तरावरून निवेदने देण्यात येत असून, संबंधित अज्ञात इसमाची त्वरीत चौकशी करून अटक करण्यात यावी व सिद्धार्थ भोकरे यांना तात्काळ सुरक्षा पुरवावी, अशी आमची मागणी आहे.

याबाबत लवकरात लवकर या घटनेतील आरोपीस अटक करून कठोर कारवाई केली गेली नाही, तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सर्व पत्रकार बांधव व राज्यातील पत्रकार रस्त्यावर उतरून न्याय मागणीकरीता संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास राव आरोग्य, उपाध्यक्ष प्रा. महेश पानसे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करतील.

शासनाकडे खालील मागण्या सादर करण्यात येत आहेत. सिद्धार्थ भोकरे यांना धमकी देणाऱ्या अज्ञात इसमाचा शोध घेऊन त्याला त्वरित अटक करण्यात यावी., सिद्धार्थ भोकरे यांना तात्काळ पोलीस संरक्षण पुरवण्यात यावे,सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोर्षीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.या मागणीचे निवेदन घुग्घूस पोलीस ठाण्याचे प्रभारी ठाणेदार सचिन तायवाडे यांना देण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघांचे घुग्घूस शाखा अध्यक्ष सुरेश खडसे, कार्याध्यक्ष संजय पडवेकर, उपाध्यक्ष कल्याण सोदारी,तालुका डिजिटल मीडिया अध्यक्ष साहिल सैय्यद, संघटक पंकज रामटेके, कोषाध्यक्ष कयामूल हसन सिद्दिकी, सदस्य दशरथ आसपवार उपस्थित होते.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३

※ स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी ※ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

